# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/पापु व मलनि:/२५०४/२०२४-२५ दि. १०/१० /२०२४

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** प्रेसनोट महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.

सोबत जोडलेली प्रेसनोट महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच सदर प्रेस नोट प्रसिद्ध केल्यानंतर या विभागास वृत्तपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

(दिपक खांबित)
शहरअभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- सिस्टम मॅनेजर
(वेबसाइट प्रसिद्धिकरीता)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

### // प्रेसनोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ९९ किमी लांबीच्या मलवाहिनी अंथरण्यात आलेल्या असून प्रचलित पद्धतीनुसार मुख्य मलवाहिनी ते सोसायटीने प्रवेश द्वारापर्यंत महानगरपालिकमार्फत मलवाहिनी अंथरण्यात येत होती. तर प्रवेशद्वार ते सेप्टीक टँकपर्यंत सोसायटीच्या खर्चाने मलवाहिनी टाकण्यात येते. महानगरपालिकेमार्फत मोठ्या स्वरुपात आर्थिक भार सहन करावा लागत होता. सदर खर्चात बचत होऊन सदर मलवाहिनी जोडण्याच्या कामात गती येणेसाठी महानगरपालिकेने खालील धोरण निश्चित केले आहे.

१. गृहसंकुल/ इमारतीच्या सेप्टीक टँक पासून मुख्य प्रवेशव्दारापर्यंत संबंधितांनी स्वखर्चाने योग्य व्यासाचा एन.पी.३ ग्रेड आर.सी.सी. पाईप वापरून सदर मलवाहिनी अंथरण्यात यावी.

२. गृहसंकुल/इमारतीचे प्रवेशव्दार ते महानगरपालिकेची मुख्य रस्तयावर रस्त्याच्या मधोमध मलवाहीनी व त्यावर चेंबर असल्याने सदर मलवाहिनी टाकताना विविध सेवा संस्था वाहीन्या, पुरवठादार यांच्या वाहिन्या, मनपाची जलवाहिनी, गॅसवाहिनी इत्यादी जात असल्याने सदर भागात काळजीपूर्वक रस्ता खोदून मलवाहिनी अंथरणे आवश्यक असल्याने सदर कामे करण्यासाठी तसेच रस्ता दुरुस्ती करण्यासाठी दर मंजूर करून कंत्राटदाराचे पॅनेल करता येईल. आवश्यकतेनुसार संबंधित गृहसंकुल/इमारत धारकांनी मंजूर दराने होणारा खर्च संबंधित कंत्राटदाराकडे भरून मलवाहिनीचे काम करून घेण्यात यावे.

३. नविन बांधण्यात आलेल्या तसेच बांधकात परवानगी देण्यात आलेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सदर इमारतीचे प्रवेशव्दार ते महानगरपालिकेच्या मुख्य मलवाहिनीवरील चेंबर पर्यंत मलवाहिनी जोडली आहे. याबाबत महानगरपालिकेच्या मलनि:सारण विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

४. अरुंद रस्ता असलेल्या ठिकाणी असलेल्या इमारतींनी जोडणी देण्यासाठी सदर ठिकाणी अंतर्गत मलवाहिनी महानगरपालिकेमार्फत टाकण्यात यावी व मुख्य मलवाहिनी सदर वाहीनी जोडण्यात यावी सदर मलवाहिनी महानगरपालिकेकडून अंथरण्यात येईल.

५. ज्या इमारतीनी जुन्या धोरणानुसार त्यांचे प्रवेशव्दारापर्यंत मलवाहीनी टाकून ठेवली आहे व महानगरपालिकेकडे जोडणी फी जमा केली आहे. त्या ठिकाणी प्रवेशव्दार ते चेंबर पर्यंतची जोडणी काम गृहसंकुलनाच्या खर्चाने वरील कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

६. सदर जोडणी देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत रु.२५,०००/- पर्यवेक्षण फी जमा करून घेण्यात येईल. जसेच जलजोडणी, मलजोडणी व इतर सेवा संस्था वाहिन्या तुटल्यास त्याचा खर्च गृहसंकुल: इमारती धारकाकडून वसूल करण्यात येईल.

७. वरील कामपूर्ण झाल्यावर महानगरपालिकेमार्फत प्रमाणपत्र देऊन मुख्य मलवाहिनीच्या चेंबर ठिकाणी जोडणी करता येईल.

८. वरील धोरणामध्ये काही बदल करावयाचा असल्यास सदर अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.

सदर कामासाठी महानगरपालिकेने कंत्राटदार यांचे पॅनेल करून दर निश्चित केले आहेत. तसेच सदर प्रकिया राबविण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात येत असून सर्व परवानग्या व रकमा जमा करणे हे ऑनलाईन होणार असून त्यासाठी महानगरपालिकेत येण्याची गरज नाही.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका